सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १८६९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४

# मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९

( दिनांक ३१ ऑगस्ट २००६ पर्यंत सुधारित )

## Act No. XIV of 1869

# The Bombay Civil Courts Act, 1869

*( As modified upto 31st August 2006 )*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[ किंमत : रुपये ६.०० ]

# मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९.

## अनुक्रमणिका


उद्देशिका. पृष्ठे

कलमे.

**प्रकरण -एक**

**प्रारंभिक**

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व व्याप्ती .. | ५ |
| २. | [ निरसित करण्यात आले ] .. | ५ |

**प्रकरण -दोन**

**जिल्हे आणि सदर स्टेशन**

| | | |
|---|---|---|
| ३. | जिल्ह्यात फेरफार करणे आणि नवीन जिल्हे बनविणे .. | ५ |
| ४. | सदर स्टेशनाची जागा .. | ५ |

**प्रकरण - तीन**

**जिल्हा न्यायालये**

| | | |
|---|---|---|
| ५. | जिल्हा न्यायाधीश .. | ६ |
| ६. | जिल्हा न्यायालयाची जागा .. | ६ |
| ७. | जिल्हा न्यायालयाचे प्रारंभिक क्षेत्राधिकार .. | ६ |
| ८. | जिल्हा न्यायालयाचे अपील क्षेत्राधिकार .. | ६ |
| ९. | न्यायालयांवर नियंत्रण ठेवणे आणि त्याची तपासणी करणे .. | ६ |
| १०. | लेख आणि आदेश .. | ६ |
| | प्रतिवृत्ते आणि पत्रके .. | ६ |
| ११. | जिल्हा न्यायाधिशाचा शिक्का .. | ६ |

**प्रकरण - चार**

**जिल्हा सह न्यायाधीश**

| | | |
|---|---|---|
| १२. | जिल्हा सह न्यायाधीश नेमण्याचा अधिकार .. | ७ |
| १२अ. | एका जिल्ह्यातील जिल्हा न्यायाधीश किंवा अपर जिल्हा न्यायाधीश याची दुसऱ्या जिल्ह्यांतील जिल्हा सह न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार. .. | ७ |
| १३. | जिल्हासह न्यायाधिशास लागू असणारे अधिनियम : जिल्हा सह न्यायाधीशाचा शिक्का. .. | ७ |

अनुक्रमणिका–चालू


| कलमे | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| | **प्रकरण–पाच** | | |
| | **अपर जिल्हा न्यायाधीश** | | |
| १४. | अपर जिल्हा न्यायाधीश नेमण्याचा अधिकार | . . | ८ |
| १५. | अपर जिल्हा न्यायाधिशाच्या न्यायालयाची जागा | . . | ८ |
| १६. | अपर जिल्हा न्यायाधिशांचे प्रारंभिक क्षेत्राधिकार | . . | ८ |
| १७. | अपर जिल्हा न्यायाधिशांचे अपील क्षेत्राधिकार | . . | ८ |
| १८. | [ वगळण्यात आले ] | | |
| १९. | अपर जिल्हा न्यायाधिशाकडे जिल्हा न्यायाधिशाचे अधिकार सोपवून देण्याचा अधिकार. | . . | ९ |
| २०. | अपर जिल्हा न्यायाधिशाने जिल्हा न्यायाधिशाचा शिक्का वापरणे | . . | ९ |
| | **प्रकरण–सहा** | | |
| | **दिवाणी न्यायाधीश** | | |
| २१. | दुय्यम दिवाणी न्यायालयांची संख्या | . . | ९ |
| २२. | दिवाणी न्यायाधिशांची नेमणूक | . . | ९ |
| २२अ. | दिवाणी न्यायाधिशांच्या क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दी ठरविण्याचा अधिकार | | १० |
| २३. | दुय्यम न्यायालयांची जागा, संयुक्त दिवाणी न्यायाधिशांची नियुक्ती | . . | १०, ११ |
| | संयुक्त दिवाणी न्यायाधिशांस लागू असणाऱ्या तरतुदी | | |
| २४. | दिवाणी न्यायाधिशांचे वर्ग. | | ११, १२ |
| | (वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशांचे क्षेत्राधिकार | | |
| | (कनिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशांचे क्षेत्राधिकार | . . | १२ |
| २५. | (वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशांचे विशेष क्षेत्राधिकार | . . | १२ |
| २६. | त्यांच्या निर्णयावर अपील करणे | . . | १२ |
| २७. | (वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाचे किंवा लघुवाद न्यायालयाच्या न्यायाधिशाचे अपील क्षेत्राधिकार. | . . | १२ |
| २८. | दिवाणी न्यायाधिशांकडे लघुवाद न्यायालयाचे अधिकार सोपविण्याचा अधिकार | | १३ |
| २८-अ. | विवक्षित अधिनियमांअन्वये दिवाणी न्यायाधिशांस क्षेत्राधिकार देण्याचा अधिकार. | | १३ |
| २९. | दिवाणी न्यायाधिशाचा शिक्का | . . | १४ |
| ३०-३१. | [ निरसित करण्यात आले ] | . . | १४ |
| ३२. | सरकारसंबंधी दावे काढून टाकणे किंवा तात्पुरते दूर करणे | . . | १४ |
| ३३. | [ निरसित करण्यात आले ] | . . | १५ |
| ३४. | [ निरसित करण्यात आले ] | . . | १५ |

अनुक्रमणिका–चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| | **प्रकरण–सात** | |
| | **तात्पुरत्या रिक्त जागा.** | |
| ३५. | जिल्हा न्यायाधिशाचे तात्पुरते रिक्त झालेले पद | १५ |
| ३६. | जिल्हा न्यायाधिशाचे अधिकार सोपविणे | १६ |
| ३७. | दुय्यम न्यायाधिशाचे तात्पुरते रिक्त झालेले पद | १६ |
| | **प्रकरण–आठ** | |
| | **प्रशासी अधिकारी** | |
| ३८. | [ निरसित करण्यात आले ] | १६ |
| ३९. | प्रशासी अधिकाऱ्यांची कर्तव्ये | १६ |
| ४०. | न्यायालयाचे कारकून नेमण्याचे अधिकार | १६ |
| ४०-अ. | [ निरसित करण्यात आले ] | १६ |
| | **प्रकरण–नऊ** | |
| | **संकीर्ण** | |
| ४१. | कामकाज ठेवण्यासंबंधी नियम | १७ |
| ४१-अ. | लायसन दिलेले विनंती-अर्ज लिहून देणे | १७ |
| ४२. | आदेशिकेची फी | १७ |
| ४३. | न्यायालयाची बैठक | १७ |
| | सुट्या | १७ |
| | अनुसुची [ निरसित करण्यात आले ] | १७ |

# सन १८६९ चा मुंबई अधिनियम, १४[१]

## [मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९]†

[१९ मार्च, १८६९]

**हा अधिनियम पुढील अधिनियमांअन्वये अंशतः निरसित करण्यात आला :-**

सन १८७० चा अधिनियम १४.

सन १८७६ चा अधिनियम १२.

सन १८८९ चा अधिनियम ७.

सन १८९० चा अधिनियम ८.

सन १८९१ चा अधिनियम १२.

सन १९१० चा मुंबई अधिनियम १.

**या अधिनियमात पुढील अधिनियमांअन्वये सुधारणा करण्यात आल्या :-**

सन १८७६ चा अधिनियम १०.

सन १८८० चा अधिनियम ९.

सन १८८० चा अधिनियम १५.

सन १९३० चा अधिनियम २८.

सन १८९५ चा मुंबई अधिनियम ३.

सन १९०० चा मुंबई अधिनियम १.

सन १९१२ चा मुंबई अधिनियम ५.

सन १९१४ चा मुंबई अधिनियम ५.

सन १९२६ चा मुंबई अधिनियम ६.

सन १९२७ मुंबई अधिनियम ९.

सन १९३० चा मुंबई अधिनियम ७.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे त्यांत अनुकूलन व रूपभेद करण्यांत आले.

**या अधिनियमात पुढील अधिनियमांअन्वये सुधारणा करण्यात आल्या :-**

सन १९४२ चा मुंबई अधिनियम ११.*

सन १९४२ चा मुंबई अधिनियम २०.*

सन १९४५ चा मुंबई अधिनियम १०.*

---

१. उद्देश व कारण यांचे निवेदन, यासाठी भारताचे राजपत्र १८६९ याचे पृष्ठ क्र. १०० पहावे; आणि परिषदेतील कार्यवाहीसाठी वरील राजपत्र पहावे. पूरक पृष्ठ ५९, १८०, १८५, ३३६, ४२१ व ४६४.

† हा अधिनियम लागू करण्यात आला आणि सन १९५८ चा मुंबई ९४ (सन १९५८ चा मुंबई ९४ याचे कलम २ पहा) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास याद्वारे लागू करण्यात येत आहे आणि अशा रीतीने लागू केल्यामुळे तो त्या भागात अंमलात राहील.

* सन १९४७ चा मुंबई क्रमांक ४८ याद्वारे हा अधिनियम पुन्हा लागू करण्यात आला.

भारतीय स्वातंत्र्य (केंद्रिय अधिनियम अध्यादेश आणि अनुकूलन) आदेश, १९४८ अनुकूलन आणि रूपभेद करण्यांत आले :–

**या अधिनियमांत पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्या :-**

सन १९४९ चा मुंबई अधिनियम २२.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम ५४†.

---

† सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४ याचे कलम ६ पुढील प्रमाणे वाचावे :—

व्यावृत्ती "६ या अधिनियमाची कलमे २ ते ५ (दोन्ही धरुन) यांच्या तरतुदींद्वारे उक्त अधिनियमात करण्यात आलेली सुधारणा पुढील बाबतीत परिणामक होणार नाही व लागू होणार नाही;—

(अ) हा अधिनियम अमलात येण्याच्या दिनांकास कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या ज्या दिवाणी स्वरुपाच्या दाव्यातील किंवा कार्यवाहीतील विषयाची रक्कम किंवा मूल्य हे पाच हजार रुपयोपेक्षा अधिक परंतु दहा हजार रुपयोपेक्षा कमी असेल असा दिवाणी स्वरुपाचा कोणताही दावा किंवा कार्यवाही असा कोणताही दावा किंवा कार्यवाही ही, जणू काही हा अधिनियम संमत झाला नव्हता अशा प्रकारे, चालू ठेवण्यात येईल व निकालात काढण्यात येईल ; आणि

(ब) (एक) ज्या दाव्यातील किंवा कार्यवाहीतील विषयाची रक्कम किंवा मूल्य हे खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल अशा कोणत्याही दाव्यामध्ये किंवा कार्यवाहीमध्ये काढलेल्या मूळ वा अपील हुकूमनाम्यावर वा आदेशावर दाखल करण्यात आलेली आणि हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेले कोणतेही अपील ;

(दोन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी काढलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर दाखल करण्यात आलेले कोणतेही अपील.

असे कोणतेही अपील, जणू काही हा अधिनियम संमत झाला नव्हता अशा प्रकारे चालू ठेवण्यात येईल किंवा दाखल करण्यात येईल वा निकालात काढण्यात येईल."

KEXAMS

* त्यात पुढील आदेशान्वये अनुकूलने व रूपभेद करण्यात आले :-

विधी अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५० चा मुंबई अधिनियम ३६$.

विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९४$.

---

$ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९४ याचे कलम ८ पुढील प्रमाणे वाचावे :-

"८. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी राज्याच्या ज्या भागास मुख्य अधिनियम लागू नव्हता त्या भागास तो लागू केल्यावर— निरसन व व्यावृत्ती.

(१) मध्यप्रांत व वऱ्हाड न्यायालय अधिनियम, १९१७,

(२) हैदराबाद दिवाणी न्यायालय अधिनियम, १९५४,

(३) सौराष्ट्र जिल्हा व दिवाणी न्यायालय अध्यादेश, १९४८, आणि

(४) कच्छ (न्यायालय) आदेश, १९४८

हे रद्द होतील :

परंतु हे अधिनियम अशा रीतीने रद्द झाल्यामुळे अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमांच्या, अध्यादेशाच्या किंवा आदेशाच्या पूर्वीच्या अंमलास बाध येणार नाही आणि त्यांच्या उपबंधांनुसार किंवा त्यान्वये केलेले कोणतेही कृत्य किंवा उपाययोजना (यांत बनविण्यात आलेले जिल्हे, ठरविलेल्या मर्यादा, स्थापन केलेली किंवा रचना केलेली न्यायालये, केलेल्या नेमणुका, केलेले नियम, दिलेले आदेश, नेमून दिलेली कामे, दिलेले अधिकार, विहित केलेले शिक्के किंवा नमुने, ठरविलेला किंवा निहित केलेला क्षेत्राधिकार, काढलेल्या अधिसूचना किंवा नोटिसा व चालविलेले कामकाज या गोष्टींचा समावेश होतो), ही मुख्य अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, मुख्य अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेले कृत्य किंवा केलेली उपाययोजना आहे असे समजले पाहिजे. आणि मुख्य अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही कृत्यावरून किंवा उपाययोजनेवरून रद्द करण्यात आली नसेल तर व रद्द करण्यांत येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

तसेच कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकाऱ्यासमोर अनिर्णित असलेले सर्व कामकाज मुख्य अधिनियमान्वये तत्सम न्यायालयाकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे, आणि असे तत्सम न्यायालय किंवा प्राधिकारी नसेल तर, किंवा असे तत्सम न्यायालय कोणते किंवा तत्सम प्राधिकारी कोण याबाबत शंका उपस्थित झाली असेल तर उच्च न्यायालय नामोद्दिष्ट करील त्या न्यायालयाकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात आले आहे असे समजले पाहिजे, आणि ते अशा न्यायालयासमोर किंवा प्राधिकाऱ्यासमोर चालू ठेवण्यात आले पाहिजे व त्याजकडून ते निकालात काढण्यात आले पाहिजे."

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ४६§ (१-१-१९७८)‡.

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम १० (१-१-१९८४)‡

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम २७@ (२८-९-१९८४)‡

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम ३ (१३-१-१९९९)‡

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम ३५ @@‡.

---

‡ ही खूण अधिनियमाच्या प्रारंभीचा दिनांक दर्शविते.

§ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याचे कलम १९ पुढील प्रमाणे वाचावे.

व्यावृत्ती. "१९. पूर्वोक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमात या अधिनियमाद्वारे केलेल्या सुधारणांचा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस कोणत्याही न्यायालयात दाखल केलेल्या व त्याच्याकडे प्रलंबित असलेल्या दिवाणी स्वरुपाच्या कोणत्याही वादांच्या, अपिलांच्या किंवा इतर कार्यवाहीच्या बाबतीत परिणाम होणार नाही व त्याबाबतीत त्या लागू असणार नाहीत व अशी कार्यवाही जणू काही हा अधिनियम संमत करण्यात आलेला नसल्याप्रमाणे त्या न्यायालयाकडून चालू ठेवण्यात येईल व निकालात काढण्यात येईल; तसेच या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या किंवा दिलेल्या आदेशाच्या बाबतीतील दिवाणी स्वरुपाचे कोणतेही अपील, पुनरीक्षण अर्ज किंवा इतर कार्यवाही जणू काही हा अधिनियम संमत करण्यात आलेला नसल्याप्रमाणे, अशा प्रारंभापूर्वी अशी कार्यवाही करण्यास सक्षम असणाऱ्या न्यायालयापुढे दाखल करण्यात येईल व तिची सुनावणी करण्यात येईल व ती निकालात काढण्यात येईल."

@ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याचे कलम ३ पुढील प्रमाणे वाचावे :–

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० द्वारे करण्यात आलेल्या सुधारणांचा प्रलंबित कामकाजावर होणारा परिणाम व व्यावृत्ती. "३. (१) १ जानेवारी १९८४ रोजी (या कलमात यानंतर जिचा निर्देश "उक्त तारीख" असा करण्यात आलेला आहे) अंमलात आलेला मुंबई दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, १९८२ द्वारे करण्यात आलेल्या सुधारणांचा उक्त तारखेस कोणत्याही न्यायालयात सादर करण्यात आलेले व प्रलंबित असलेले दिवाणी स्वरुपाचे कोणतेही दावे, अपिले किंवा इतर कामकाज या संबंधात कोणताही परिणाम होणार नाही व अशा सुधारणा, असे दावे, अपिले किंवा कामकाज यास लागू होणार नाहीत आणि जणू उक्त अधिनियम संमत झालेला नाही असे समजून उक्त न्यायालयाकडून असे दावे, अपिले व इतर कामकाज चालू ठेवण्यात व निकालात काढण्यात येईल; आणि उक्त तारखेपूर्वी कोणत्याही न्यायालयाने दिलेला कोणताही हुकुमनामा किंवा आदेश यासंबंधीचे दिवाणी स्वरूपाचे कोणतेही अपील, फेरतपासणी अर्ज किंवा इतर कामकाज हे, जणू उक्त अधिनियम संमत झालेला नाही असे समजून, उक्त तारखेपूर्वी असे कामकाज दाखल करून घेण्यास जे न्यायालय सक्षम असेल त्या न्यायालयात दाखल करण्यात येईल व त्या न्यायालयाकडून त्याची सुनावणी करण्यात येऊन ते निकालात काढण्यात येईल. सन १९८३ चा महाराष्ट्र १०.

(२) उक्त तारखेपूर्वी अपील, फेरतपासणी अर्ज किंवा इतर कामकाज दाखल करून घेण्यास जे न्यायालय सक्षम असेल त्या न्यायालयाखेरीज इतर न्यायालयात, दाखल केलेले अपील, फेरतपासणी अर्ज किंवा इतर कामकाज यामध्ये उक्त तारखेपूर्वी कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हूकुमनाम्याविरूध्दचे किंवा आदेशाविरूध्दचे दिवाणी स्वरुपाचे कोणतेही अपील, फेरतपासणी अर्ज किंवा इतर कामकाज हे, उक्त तारीख व मुंबई दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, १९८४ याच्या प्रारंभाची तारीख (दोन्ही दिवस धरून) यामधील कालावधीत, पूर्वोक्तप्रमाणे असे कामकाज दाखल करून घेण्यास सक्षम असेल अशा न्यायालयाकडे हस्तांतरित करण्यात येईल आणि मुंबई दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, १९८२ हा संमत झालेला नाही असे समजून, उक्त न्यायालयाकडून अशा रीतीने हस्तांतरित केलेल्या कामकाजाची सुनावणी करण्यात येऊन ते निकालात काढण्यात येईल". १९८४ चा महाराष्ट्र २७. १९८३ चा महाराष्ट्र १०.

@@ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५ चे कलम ३ पुढीलप्रमाणे वाचावे :–

व्यावृत्ती. "३. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ श्रेणी) यांच्याबाबतीत, दिवाणी स्वरूपाच्या ज्या दाव्याच्या वादाविषयीची रक्कम किंवा मूल्य हे तीन हजार रुपयांपेक्षा अधिनियम परंतु बारा हजार रुपयांपेक्षा कमी असेल आणि दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ श्रेणी) यांच्याबाबतीत, जेथे वादविषयाची रक्कम किंवा मूल्य पंधराशे रुपयांपेक्षा अधिक परंतु सहा हजार रुपयांपेक्षा कमी असेल, अशा बाबतीत हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकाला, कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असेलल्या दिवाणी स्वरुपाच्या कोणत्याही दाव्यांच्या किंवा कार्यवाहींच्या संबंधात या अधिनियमाच्या कलम २ च्या तरतुदींद्वारे, मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९ यात करण्यात आलेल्या सुधारणांचा कोणताही परिणाम होणार नाही आणि या सुधारणा त्यांना लागू होणार नाहीत. जणू काही हा अधिनियम संमत झालेला नव्हता असे समजून उक्त न्यायालयाकडून असा कोणताही दावा किंवा कार्यवाही चालू ठेवण्यात येईल व निकालात काढण्यात येईल". १८६९ चा १४.

# मुंबई इलाख्यातील जिल्हा दिवाणी न्यायालये आणि कनिष्ठ दिवाणी न्यायालये यासंबंधीचा विधि एकत्रित करणारा व त्यात सुधारणा करणारा अधिनियम

**ज्याअर्थी,** मुंबई इलाख्यांतील जिल्हा दिवाणी, न्यायालये आणि इतर कनिष्ठ दिवाणी न्यायालये यासंबंधीचा विधि एकत्रित करून त्यांत सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— उद्देशिका.

## प्रकरण – एक

## प्रारंभिक

[१][१. (१) या अधिनियमास, मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

(२) तो संबंध [२][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.]

२. सन १८७० चा अधिनियम १४ याअन्वये निरसित करण्यात आले. निरसित करण्यात आले.

## प्रकरण – दोन

## जिल्हे आणि सदर स्टेशन

३[३][[४][राज्य] शासनास] वेळोवेळी, [५][राजपत्रांत]. प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, [६][अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांच्या हद्दीत] (ज्यांना यापुढे जिल्हे संबोधण्यात येईल.) फेरफार करण्याची आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता नवीन जिल्हे बनवण्याचा अधिकार आहे. जिल्ह्यात फेरफार करणे आणि नवीन जिल्हे बनविणे.

४. तसेच, [७][[८][राज्य शासनाला] वेळोवेळी, [९][राजपत्रांत] प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही जिल्ह्यातीन सदर स्टेशनाच्या जागेत फेरफार करण्याचा आणि कोणत्याही नवीन जिल्ह्यांत सदर स्टेशनाची जागा ठरविण्याचा अधिकार आहे. सदर स्टेशनची जागा.

---

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९४, कलम ३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.
२. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. या संबंधात पुढील कलम २२क पहा.
७. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
८. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
९. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण – तीन

## जिल्हा न्यायालयें.

**जिल्हा न्यायाधीश.** ५. प्रत्येक जिल्ह्यांत एक जिल्हा न्यायालय असेल आणि अशा न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून जिल्हा न्यायाधीश काम करील [४][* * * *] [५][* * *]

**जिल्हा न्यायालयाची जागा.** ६. जिल्हा न्यायाधिशाने सामान्यत: आपल्या जिल्ह्यांतील सदर स्टेशनांत जिल्हा न्यायालय भरवावे, परंतु त्यांस, उच्च न्यायालयाची पूर्वमंजुरी घेऊन, जिल्ह्यांतील अन्य ठिकाणी जिल्हा न्यायालय भरविण्याचा अधिकार आहे.

**जिल्हा न्यायालयाचे प्रारंभिक क्षेत्राधिकार.** ७. जिल्हा न्यायालय हे [*दिवाणी प्रक्रिया संहितेच्या] अर्थानुसार अशा जिल्ह्यांतील मुख्य प्रारंभिक दिवाणी न्यायालय असेल.

**जिल्हा न्यायालयाचे अपील क्षेत्राधिकार.** ८. कलमे १६, १७ आणि २६ यांत जी कोणतीही तरतूद केली असेल ती खेरीज करून, जिल्हा न्यायालय, हे कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या ज्या हुकुमनाम्यावर व आदेशावर त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या विधिअन्वये अपील करतां येईल त्या सर्व हुकुमनाम्यावर व आदेशावर अपील करण्याचे न्यायालय असेल.

**न्यायालयांवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांची तपासणी करणे.** ९. जिल्ह्यातील दिवाणी न्यायालयें आणि त्यांचा सेवक वर्ग यांजवर जिल्हा न्यायाधिशांचे सामान्य नियंत्रण राहील आणि दुय्यम असलेल्या सर्व न्यायालयांच्या कामाकाजाची तपासणी करणे किंवा आपल्या सहाय्यकापैकी एकाकडून तपासणी करविणे आणि ज्या कोणत्याहि गोष्टीसंबंधी विधीत तरतूद करण्यांत आली नसेल त्या सर्व गोष्टीसंबंधी त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे निदेश देणें हे त्यांचे कर्तव्य असेल.

जिल्हा न्यायाधिशाने अशा ज्या सर्व गोष्टींबाबत उच्च न्यायालयानें निर्णय देणे त्यास आवश्यक वाटत असेल त्या सर्व गोष्टी देखील उच्च न्यायालयाकडे पाठविल्या पाहिजेत.

**लेख आणि आदेश.** १०. जिल्हा न्यायाधिशानें उच्च न्यायालयाकडून देण्यांत आलेलें सर्व लेख, आदेश व आदेशिका यांचें पालन केलें पाहिजे आणि त्यानें उच्च न्यायालयाकडे प्रकरणाच्या निकडीनुसार आवश्यक असतील अशी पत्रकें व प्रतिवृत्ते आपल्या सही निशी व न्यायालयाचा शिक्का लावून पाठविली पाहिजेत.

**प्रतिवृत्ते आणि पत्रके.** तसेच त्याने, उच्च न्यायालय किंवा [१][[२][राज्य] शासन] मागणी करील अशी प्रतिवृत्ते व पत्रके व कामकाजासंबंधीच्या प्रती पुरविल्या पाहिजेत.

**जिल्हा न्यायाधिशाचा शिक्का.** ११. जिल्हा न्यायाधिशाने दोन इंच व्यास असलेला वर्तुळाकार आणि [६][अशोक स्तंभ शीर्षाकृति] असलेला शिक्का वापरला पाहिजे. अशा शिक्क्यावर इंग्रजी भाषेत आणि त्या जिल्ह्यांच्या मुख्य भाषेत पुढील मजकूर असेल : –

"...................चें जिल्हा न्यायालय."

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
५. सन १९७६ चा अधिनियम क्रमांक १२ अन्वये हा मजकूर निरसित करण्यात आला.
६. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
* दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) पहावे.

## प्रकरण-चार

### [1][जिल्हा सह न्यायाधीश]

१२. [2][[3][राज्य] शासनास] [4][*   *   *] कोणत्याही जिल्ह्यांत, ज्यास [1][जिल्हा सह न्यायाधीशाप्रमाणें] समव्याप्ति अधिकार व समवर्ती क्षेत्राधिकार देण्यात येतील, अशा [1][जिल्हा सह न्यायाधीशांची] नेमणूक करण्याचा अधिकार आहे. परंतु, त्याने दिवाणी दाव्यांचे दफ्तर ठेवणे आवश्यक असणार नाही आणि त्याने फक्त जिल्हा न्यायाधीशाकडून मिळालेले किंवा उच्च न्यायालयाच्या आदेशांन्वये त्याकडे देण्यात येतील असे दिवाणी कामकाज चालविले पाहिजे. [1][जिल्हा सह न्यायाधीश] नेमण्याचा अधिकार

[5][   *   *   *   *   ]

[6][ १२-अ [2][[3][राज्य] शासनास] कोणत्याही जिल्ह्यांतील जिल्हा न्यायाधीश किंवा [7][अपर जिल्हा न्यायाधीश] याची दुसऱ्या जिल्ह्यातील [1][जिल्हा सह न्यायाधीश] म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे. अशा [1][जिल्हा सह न्यायाधिशास] कोणत्याही जिल्ह्यातील त्यास योग्य वाटेल अशा जागी किंवा अशा अनेक जागी त्याचे न्यायालय भरवून दिवाणी कामकाज चालविण्याचा अधिकार आहे. एका जिल्ह्यातील जिल्हा न्यायाधीश किंवा [7][अपर जिल्हा न्यायाधीश याची दुसऱ्या जिल्ह्यातील [1][जिल्हा सह न्यायाधीश] म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार.

KEXAMS

१३. जे अधिनियम आणि विनियम सध्या अंमलांत असतील किंवा यानंतर अंमलांत येतील आणि जे जिल्हा न्यायाधीशास लागू असतील ते अधिनियम व विनियम [1][जिल्हा सह न्यायाधिशास] लागू असल्याचे समजण्यात आले पाहिजे आणि जिल्हा न्यायाधीश जो शिक्का वापरीत असेल तोच शिक्का [1][जिल्हा सह न्यायाधिशाचा] असेल. [1][जिल्हा सह न्यायाधिशास लागू असणारे अधिनियम; [1][जिल्हा सह न्यायाधिशाचा] शिक्का.

---

१. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजीव्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९१० चा मुंबई अधिनियम क्रमांक १ अन्वये हा मजकूर रद्द करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये दुसरा खंड रद्द करण्यात आला.

६. सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, याच्या कलम २ द्वारे तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ३ द्वारे कलम १२ क दाखल करण्यात आले.

७. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण-पाच

### [1] [अपर जिल्हा न्यायाधीश.]

[1] [अपर जिल्हा न्यायाधीश ] नेमण्याचा अधिकार

१४. [2][ [3][राज्य] शासनास] जिल्हा न्यायाधिशाकरिता [4][ * * * ] एक किंवा अधिक [5][अपर जिल्हा न्यायाधिश ] नेमण्याचा [6][ * * * ] अधिकार आहे.

[1][अपर जिल्हा न्यायाधिशाच्या] न्याया-लयाची जागा.

१५. जिल्हा न्यायाधिशाचे न्यायालय ज्या ठिकाणी भरविण्यात येते त्याच ठिकाणी सामान्यत : [1][अपर जिल्हा न्यायाधीशाने ] आपले न्यायालय भरविले पाहिजे. परंतु, जिल्हा न्यायाधीशाने उच्च न्यायालयाची पूर्व मंजूरी घेऊन, तसा निदेश दिल्यास सहाय्यक न्यायाधीशास आपले न्यायालय जिल्ह्यांत इतर ठिकाणी भरविता येईल.

[1] [ अपर जिल्हा न्यायाधिशाचे प्रारंभिक ] क्षेत्राधिकार.

१६. जिल्हा न्यायाधीशास, [7][दिवाणी स्वरुपाचे कोणतेही प्रारंभिक दावे व कार्यवाह्या ] [8][विशेष अधिनियमांन्वयेचे अर्ज किंवा उल्लेख] आणि [9] [ * * * ] किरकोळ अर्ज हे त्यास कनिष्ठ असलेल्या कोणत्याही [1] [अपर जिल्हा न्यायाधीशांकडे ] निर्णयासाठीं पाठविण्याचा अधिकार आहे.

[1] [अपर जिल्हा न्यायधिशांस] अशा दाव्यांचा न्यायचौकशी करण्याचा आणि असे अर्ज [10] [किंवा बाबी] निकालांत काढण्याचा क्षेत्राधिकार आहे.

[1] [अपर जिल्हा न्यायधिशाने केलेल्या हुकुमनाम्यावर किंवा दिलेल्या आदेशावर अपील करतां येत असेल अशा प्रकरणांत दाव्याच्या वाद विषयाची रक्कम किंवा किंमत [11] [ दोन लाख रुपयांपेक्षा अधिक] असल्यास उच्च न्यायालयाकडे आणि दहा हजार रुपयांवर ] नसेल तर जिल्हा न्यायाधिशाकडे, अपील करता येईल.

[12] [ * * * ]

[1] [अपर जिल्हा न्यायाधिशाचे ] अपील क्षेत्राधिकार.

[13] [१७. [1] [अपर जिल्हा न्यायधिशास ] अधीन न्यायालयांच्या हुकुमनाम्यांवर व आदेशांवर जी अपिले जिल्हा न्यायाधीशाकडे, अपील करता येतील व [ जिल्हा ] न्यायाधीश त्याजकडे सोपविल अशा अपीलांचा इन्साफ करण्याचा क्षेत्राधिकार असेल.

[1] [ अपर जिल्हा न्यायधिशाने ] या कलमान्वये केलेले हुकूमनामे व दिलेले आदेश यांचा जिल्हा न्यायाधिशांने केलेले हुकूमनामे व दिलेले आदेश यांसारखाच अंमल असेल आणि कार्यरीती व अपिलें यांसंबंधी जे नियम आहेत त्याच नियमांस ते अधीन असतील.]

१८. [1] [ अपर न्यायाधीशांचे] [अपील क्षेत्राधिकार चालू राहणे] हे कलम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९४ अन्वये वगळण्यात आले.

---

१. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ कलम २ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
५. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (क) च्या तरतुदीनुसार मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १२ अन्वये हा मजकूर रद्द करण्यात आला.
७. सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(अ) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
८. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९४ याच्या कलम ४ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
९. सन १९०० चा मुंबई अधिनियम क्रमांक १ कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
१०. सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १२ अन्वये हा मजकूर वगळण्यातं करण्यात आला.
११. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २ अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
१२. सन १८९० चा अधिनियम क्रमांक ८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
१३. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९४, कलम ५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

१९. १[२[राज्य] शासनास] ३[राजपत्रांत] प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, जिल्ह्याच्या एखाद्या विशिष्ट भागातील जिल्हा न्यायाधिशाचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार ४[अपर जिल्हा] न्यायाधिशाकडे सोपविण्याचा अधिकार आहे ; आणि त्यास, तशाच अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, अशा भागांच्या मर्यादा ठरविण्याचा आणि त्यांत फेरफार करण्याचा अधिकार आहे. ४[अपर जिल्हा न्यायाधिशा-कडे] जिल्हा न्यायाधिशाचे अधिकार सोपवून देण्याचा अधिकार.

अशा रीतीने ४[अपर जिल्हा न्यायाधिशास] देण्यात आलेल्या क्षेत्राधिकारांतून जिल्हा न्यायाधिशाचे उक्त हद्दीतील क्षेत्राधिकार त्याच मर्यादेपर्यंत वगळण्यात येतील.

अशा रीतीने अधिकार दिलेल्या ४[अपर जिल्हा न्यायाधिशाने,] त्याच्या क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दीत १[२[राज्य] शासन] ठरवील अशा ठिकाणी सामान्यत: आपले न्यायालय भरविले पाहिजे, तसेच त्यास, उच्च न्यायालयाची पूर्व मंजूरी घेऊन, अशा हद्दीतील इतर कोणत्याही ठिकाणी न्यायालय भरविण्याचा अधिकार आहे.

२०. प्रत्येक जिल्ह्यात, ४[अपर जिल्हा न्यायाधिशाने,] जो ५[अपर जिल्हा न्यायाधिश] आहे त्याने जिल्हा न्यायाधिशाचा शिक्का वापरला पाहिजे. ४[अपर जिल्हा न्यायाधिशाने] जिल्हा न्यायाधिशाचा शिक्का वापरणे.

## प्रकरण-सहा

### ६[दिवाणी न्यायाधीश]

२१. प्रत्येक जिल्ह्यात, जिल्हा न्यायालयास १[२[राज्य] शासन] वेळोवेळी निदेश देईल इतकी ७[* * *] दुय्यम दिवाणी न्यायालये असतील : दुय्यम दिवाणी न्यायालयांची संख्या.

८[परंतु, १[२[राज्य] शासनाने] विशेष कारणास्तव कोणत्याही वेळी असे दुय्यम न्यायालय तात्पुरते बंद ठेवणे हे विधिसंमत असेल.]

२२. अशा अधीन न्यायालयाचे न्यायाधीश यांची नेमणूक १[२[राज्य] शासनाने] केली पाहिजे आणि त्यांना ६[दिवाणी न्यायाधीश] असे म्हटले पाहिजे. ९[दिवाणी न्यायाधिशांची नेमणूक.]

१० * * * * * *

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २७, कलम २ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. सन १८८४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २७, कलम २ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) कलम २ तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४८, कलम ३ अन्वये मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह हा दाखल करण्यात आला.
७. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
८. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९०० (१९०० चा मुंबई १) कलम ३ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.
९. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) कलम ३ द्वारे तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४८, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
१०. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश, द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[4][दिवाणी न्यायाधिशांच्या] क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दी ठरविण्याचा अधिकार.

[1][२२. (क) [2][[3][राज्य] शासनास] राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, [4][दिवाणी न्यायाधीशांच्या] सामान्य क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दी ठरविण्याचा, आणि तशाच अधिसूचनेद्वारे, अशा हद्दीत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

दुय्यम न्यायालयांची जागा.

२३. [4][दिवाणी न्यायाधीशांनी] [2][[3][राज्य] शासन] वेळोवेळी ठरवील अशा त्यांच्या क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दीतील जागेत किंवा जागी आपली न्यायालये भरविली पाहिजेत :

[5][परंतु,] [2][[3][राज्य] शासनाने] विशेष कारणास्तव [4][दिवाणी न्यायाधीशाने] आपले न्यायालय आपल्या क्षेत्राधिकाराच्या स्थानिक हद्दीबाहेरील जागी भरवावे, असा आदेश देणे हे विधिसंमत असेल.]

जेव्हा अशा जागा एकापेक्षा अधिक असतील तेव्हा जिल्हा न्यायाधीशाने, उच्च न्यायालयाच्या नियंत्रणास अधीन राहून, अशा प्रत्येक जागी [4][दिवाणी न्यायाधीश] ज्या दिवशी आपले न्यायालय भरवील ते दिवस ठरविले पाहिजेत. आणि [4][दिवाणी न्यायाधीशाने] त्यांच्या क्षेत्राधिकाराच्या संपूर्ण स्थानिक हद्दीत असे दिवस योग्य रीतीने अधिसूचित केले पाहिजेत.

त्याच व्यक्तीस एकाहून जास्त अधीन न्यायालयांचा न्यायाधीश होण्याचा अधिकार आहे. [6][आणि त्यास त्याच्या इतर कोणत्याही, न्यायालयाच्या मुख्य ठिकाणी, त्याच्या न्यायालयापैकी कोणत्याही न्यायालयांच्या दिवाणी कामकाजाची विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे]; आणि अशा बाबतीत, जिल्हा न्यायाधिशाने, उच्च न्यायालयाच्या नियंत्रणास अधीन राहून, [4][दिवाणी न्यायाधीश] प्रत्येक न्यायालय ज्यावेळी भरवील त्या वेळचे नियमन करण्यासाठी नियम विहित केले पाहिजेत.

संयुक्त [4][दिवाणी न्यायाधिशांची नियुक्ती]

[7][कोणत्याही अधीन न्यायालयाच्या न्यायाधिशास त्याच्या दफ्तरांतील दिवाणी कामकाजाची विल्हेवाट लावण्याच्या कामी त्यास मदत करण्यासाठी [8][उच्च न्यायालयास, [3][राज्याच्या] दुय्यम दिवाणी न्यायालयीन सेवेतील इसमापैकी] एक किंवा अधिक इसमांची संयुक्त [4][दिवाणी न्यायाधिश] म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे,] किंवा जिल्हा न्यायाधिशास, उच्च न्यायालयाची आगाऊ मंजूरी घेऊन, त्या जिल्ह्यातील दुसऱ्या दुय्यम न्यायालयाच्या न्यायाधिशास अशा न्यायालयात पाठविण्याचा अधिकार आहे. अशा रीतीने दुसऱ्या [4][दिवाणी न्यायाधीशास] त्याच्या न्यायालयात सहाय्य करण्यासाठी नेमलेल्या किंवा पाठविण्यात आलेल्या [4][दिवाणी न्यायाधीशाने] त्याच्या आर्थिक क्षेत्राधिकाराच्या मर्यादेतील, अशा न्यायालयाच्या न्यायाधिशाने त्याजकडे सोपविले असेल अशा दिवाणी कामकाजाची जिल्हा न्यायाधीशाच्या नियंत्रणास अधीन राहून विल्हेवाट लावली पाहिजे. [9][तसेच त्यास, उच्च न्यायालयाने ह्या बाबतीत जे सामान्य किंवा विशेष आदेश दिले असतील त्यास अधीन राहून, ज्या जागी त्यास पाठविले असेल त्या जागी, आपल्या न्यायालयाच्या दिवाणी कामकाजाची विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे.]]

---

१. मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८८० (१८८० चा ९) कलम २ द्वारे कलम २२ (क) समाविष्ट करण्यात आले.

२. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) कलम ३ तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४८, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

५. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९०० (१९०० चा मुंबई १) याच्या कलम ४ द्वारे हा परंतुक समाविष्ट करण्यात आले.

६. सन १९३० चा मुंबई ७ च्या कलम २ (१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७. सन १९०० चा मुंबई अधिनियम, क्रमांक १, कलम ४ द्वारे मूळ परिच्छेदाऐवजी हे दोन परिच्छेद दाखल करण्यात आले.

८. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९. सन १९३० चा मुंबई अधिनियम, क्रमांक ७, कलम २ (२) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

या कलमाच्या प्रयोजनासाठी [1][दिवाणी न्यायाधिशास] लागू असलेली या अधिनियमाची तरतूद ही संयुक्त [1][दिवाणी न्यायाधिशास] लागू असतील आणि ते त्यांस नेहमीच लागू होते असे समजण्यात आले पाहिजे, परंतु, अशा कोणत्याही संयुक्त [2][दिवाणी न्यायाधिशाने,] दक्षिणेतील शेतकऱ्यांस सहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, कलम ४ अन्वये दाखल केलेल्या कोणत्याही दाव्याची सुनावणी करता किंवा त्यावर निर्णय देता कामा नये ; परंतु उक्त दाव्याची किंमत ही त्यास ह्या अधिनियमान्वये दिलेल्या आर्थिक क्षेत्राधिकाऱ्यांच्या मर्यादेत असेल तर त्यास, त्याची सुनावणी करता येईल व त्यावर निर्णय देता येईल.]

संयुक्त [1][दिवाणी न्यायाधिशांस] लागू असणाऱ्या तरतुदी.

१८७९ चा १७

२४. [1][दिवाणी न्यायाधिशाचे] दोन वर्ग असतील.

[1][दिवाणी न्यायाधिशाचे] वर्ग.

[3][(वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधीशाच्या] क्षेत्राधिकारांत सर्व प्रारंभिक दाव्यांच्या आणि दिवाणी स्वरूपाच्या कामकाजाचा समावेश होतो.

[3][(वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशांचे] क्षेत्राधिकार.

KEXAMS

---

१. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ३ तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४८ याचे कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ४ तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४८ याचे कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ५ तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४८ याच्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(कनिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाचे] क्षेत्राधिकार.

[1][(कनिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाच्या] क्षेत्राधिकारांत, ज्याच्या वाद विषयाची रक्कम किंवा किंमत [2][एक लाख रुपयाहून] अधिक नसेल असे दावे, आणि दिवाणी स्वरुपाचे कामकाज यांचा समावेश होतो :

[3][परंतु, [4][[5][राज्य] शासनास, ज्याची दहा वर्षापेक्षा कमी नोकरी नसेल आणि ज्याच्या बाबतीत उच्च न्यायालयाने विशेष शिफारस केली असेल अशा [1][(कनिष्ठ श्रेणीच्या) कोणत्याही दिवाणी न्यायाधिशाच्या] बाबतीत [6][एक लाख पन्नास हजार रुपयांपर्यंत] मर्यादा वाढविण्याचा अधिकार आहे. अशा रीतीने अधिकार दिलेल्या [7][दिवाणी न्यायाधिशास] त्याची ज्या जिल्ह्यात नेमणूक करण्यात आली असेल त्या जिल्ह्याचा विचार न करता, तो [1][(कनिष्ठ श्रेणीचा) दिवाणी न्यायाधिश] म्हणून ज्या मुदतीपर्यंत पदावर राहील त्या मुदतीपर्यंत व तितक्या वेळा ह्या अधिकाराचा उपयोग करणे चालू ठेवता येईल ; परंतु [4][[5](राज्य) शासनाने हा अधिकार काढून घेतला नसेल तरच त्यास असा उपयोग करता येईल]

[8][(वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाचे] विशेष क्षेत्राधिकार.

२५. [8][(वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशास] त्याच्या सामान्य क्षेत्राधिकाराव्यतिरिक्त, जिल्ह्यातील [1][(कनिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाच्या] न्यायालयांच्या [9]* * * स्थानिक क्षेत्रातील [10][आणि कलम २४ अन्वये ज्यांचा वादविषय अशा [1][(कनिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाच्या] आर्थिक क्षेत्राधिकाराहून जास्त आहे अशा] दिवाणी स्वरुपाच्या दाव्यांच्या संबंधी विशेष क्षेत्राधिकार आहे.

ज्या जिल्ह्यात एकापेक्षा अधिक [1][(कनिष्ठ श्रेणीचे) दिवाणी न्यायाधीश] नेमले असतील अशा जिल्ह्यांत जिल्हा न्यायाधिशाने उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून, प्रत्येकास त्याचा उक्त विशेष क्षेत्राधिकार ज्या स्थानिक हद्दीत चालविता येईल त्या हद्दी नेमून दिल्या पाहिजेत.

त्याच्या निर्णयावर अपील करणे.

२६. दाव्याच्या वादविषयाची रक्कम किंवा किंमत [11][दोन लाख रुपयाहून] अधिक असेल अशा ज्या दाव्याचा निर्णय [12]* * * * [7][दिवाणी न्यायाधिशाने] केला असेल त्या निर्णयावर अपील परस्पर उच्च न्यायालयाकडे करता येईल.

[8][(वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाचे] किंवा लघुवाद न्यायालयाच्या न्यायाधिशाचे अपील क्षेत्राधिकार.

२७. [13][राज्य शासनास] [8][(वरिष्ठ श्रेणीच्या) कोणत्याही [8] [दिवाणी न्यायाधिशास] [14][किंवा हे कलम ज्या कोणत्याही जागेस लागू आहे त्या कोणत्याही जागी लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७, अन्वये रचना करण्यात आलेल्या लघुवाद न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधिशास] अधीन न्यायालयाच्या ज्या हुकूमनाम्यावरील आणि आदेशावरील अपीले जिल्हा न्यायाधीश त्याजकडे पाठविल त्या अपीलांची सुनावणी करण्याचा अधिकार देता येईल.

---

१. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ६ तसेच १९४७ चा मुंबई ४८, कलम ३ याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र. ३, कलम ३ (अ), द्वारे मूळ मजकुराऐवजी नवीन मजकूर दाखल करण्यात आला.
३. सन १९३० चा मुंबई अधिनियम, क्र. ७, कलम ३ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
४. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३, कलम ३ (ब), द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
७. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ४ तसेच सन १९४७ चा मुंबई ४८, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.
८. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ५ तसेच सन १९४७ चा मुंबई ४८, कलम ३ याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
९. सन १९३० चा मुंबई अधिनियम, क्र. ७, कलम ४ (१), द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
१०. सन १९३० चा मुंबई अधिनियम, क्र. ७, कलम ४ (२), द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
११. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३, कलम ४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
१२. सन १९३० चा अधिनियम क्र. २८ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.
१३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
१४. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९०० (१९०० चा मुंबई १) कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][[५](वरीष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशाने] [२][किंवा लघुवाद न्यायालयाच्या न्यायाधिशाने] अपीलात दिलेले हुकुमनामे व आदेश ह्यांचा जिल्हा न्यायाधिशाने दिलेल्या हुकुमनाम्याप्रमाणे व आदेशाप्रमाणे अंमल असेल.

[३][ या कलमान्वये अपिलांची सुनावणी करण्याचा अधिकार दिलेल्या [१](वरिष्ठ श्रेणीच्या) दिवाणी न्यायाधिशास] किंवा लघुवाद न्यायालयाच्या न्यायाधिशास त्यांची ज्या जिल्ह्यात नेमणूक करण्यात आली असेल त्या जिल्ह्याचा विचार न करता, तो अनुक्रमे [१][(वरिष्ठ श्रेणीचा) दिवाणी न्यायाधीश] म्हणून किंवा लघुवाद न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून ज्या मुदतीपर्यंत आणि तितक्या वेळी पदावर राहील त्या मुदतीपर्यंत आणि तितक्या वेळा ह्या अधिकाराचा उपयोग करणे चालू ठेवता येईल.

परंतु [४][(राज्य) शासनास] [५][राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे कोणत्याही वेळी असा अधिकार काढून घेण्याचा अधिकार आहे.]

दिवाणी न्यायाधिशाकडे लघुवाद न्यायालयाचे अधिकार सोपविण्याचा अधिकार.

" [६][२८. (१) उच्च न्यायालयास, योग्य वाटेल अशा ; परंतु, दिवाणी न्यायाधिशाच्या (वरिष्ठ श्रेणी) बाबतीत [७][बारा हजार रुपयांपेक्षा] अधिक नाही व दिवाणी न्यायाधिशांच्या (कनिष्ठ श्रेणी) बाबतीत [८][सहा हजार रुपयांपेक्षा] अधिक नाही इतक्या रकमेपर्यंतच्या लघुवाद न्यायालयांनी दखल घेण्याजोग्या दाव्यांचा इन्साफ करण्यासाठी दिवाणी न्यायाधिशांकडे लघुवाद न्यायालयाचा क्षेत्राधिकार सोपविण्याचा उच्च न्यायालयास अधिकार आहे.]

(२) पोट-कलम (१) अन्वये त्याच्याकडे लघुवाद न्यायालयाचा क्षेत्राधिकार सोपविण्यात आला असेल असा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ श्रेणी) किंवा दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ श्रेणी) यास, जोपर्यंत व जितक्या वेळी तो, यथास्थिती, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ श्रेणी) किंवा दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ श्रेणी) यांचे पद धारण करील तोपर्यंत व तितक्या वेळा, ज्या जिल्ह्यात त्यास नेमण्यात आले असेल तो जिल्हा लक्षात न घेता त्याच्या सामान्य क्षेत्राधिकारांच्या स्थानिक हद्दीत असा क्षेत्राधिकार असण्याचे चालू राहील.

(३) उच्च न्यायालयास, जेंव्हा जेंव्हा त्यास योग्य वाटेल तेंव्हा तेंव्हा अशा रीतीने क्षेत्राधिकार सोपविण्यात आलेल्या कोणत्याही दिवाणी न्यायाधिशांकडून असा क्षेत्राधिकार काढून घेता येईल."

विवक्षित अधिनियमान्वये [१०][दिवाणी न्यायाधिशास] क्षेत्राधिकार देण्याचा अधिकार.

[९][२८. अ. (१) उच्च न्यायालयास सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही [९][दिवाणी न्यायाधिशाकडे] आदेशात विहित करण्यात येतील अशा स्थानिक हद्दीत अशा आर्थिक मर्यादेस अधीन राहून यथास्थिती, भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १८६५, मृत्यु पत्रविषयींचे प्रमाणपत्र आणि त्याचे प्रशासन याबाबत अधिनियम, १८८१ [११][किंवा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, अनुसूची ३, परिच्छेद ५] याअन्वये जिल्हा न्यायाधिशाचे किंवा जिल्हा न्यायालयाचे सर्व किंवा कोणतेही अधिकार देण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये [१०][दिवाणी न्यायाधिशास] दिलेल्या अधिकारांपरत्वे त्याने दिलेल्या प्रत्येक आदेशावर, दाव्याचा वाद विषयाची रक्कम किंवा किंमत [१२][दोन लाख रुपयापेक्षा] जास्त असेल तर उच्च न्यायालयाकडे व त्यापेक्षा जास्त नसेल तर, जिल्हा न्यायालयाकडे अपील करता येईल.

---

१. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ५ तसेच १९४७ चा मुंबई ४८, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.
२. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९०० (१९०० चा मुंबई १) कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
३. सन १९०० चा मुंबई अधिनियम क्र. १, कलम ५ द्वारे मूळ परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद दाखल करण्यात आला.
४. भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. सन १९५८ चा मुंबई अधिनियम, क्र. ९४, कलम ७ द्वारे मूळ मजकूराऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.
७. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३५, कलम २६ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
८. वरील अधिनियमाच्या कलम २ब द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
९. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९१२ (१९१२ चा मुंबई ५) याच्या कलम २ द्वारे २८अ हे कलम दाखल करण्यात आले.
१०. मुंबई दिवाणी न्यायालयाने (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) कलम ४ तसेच सन १९४७ चा मुंबई ४८ कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
११. भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ पहा.
१२. सन १९९९ चा मुंबई अधिनियम क्र. ३, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) [१][दिवाणी न्यायाधिशाच्या] आदेशावर, पोट-कलम (२) अन्वये केलेल्या अपीलांत जिल्हा न्यायाधिशाने दिलेल्या प्रत्येक आदेशावर, व्यवहार प्रक्रिया संहितेत असलेले जे नियम अपीलात दिलेल्या हुकुमनाम्यावर केलेल्या अपिलास लागू असतील त्या अन्वये उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.]

[१][दिवाणी न्यायाधिशाचा शिक्का]

२९. प्रत्येक [१][दिवाणी न्यायाधिशाने]दीड इंच व्यासाचा आणि [२][(अशोक स्तंभ शीर्षाकृती]असलेला शिक्का वापरला पाहिजे. त्यावर इंग्रजी भाषेत आणि त्या जिल्ह्याच्या मुख्य भाषेत पुढील मजकूर असेल:- . . .चा [१][दिवाणी न्यायाधीश]

सरकार-संबंधी दावे.

३०. व ३१. [पहिल्या वर्गाचे अधीन न्यायाधीश ; अनिर्णित कामकाज] ही कलमे सन १८७६ चा अधिनियम १२ अन्वये रद्द करण्यात आली.

[३][३२. (१) ज्या कोणत्याही दाव्यात [४][बादशहा]किंवा [५][शासनाचा] कोणताही अधिकारी आपल्या पदाच्या नात्याने पक्षकार आहे अशा कोणताही दावा [६][(वरिष्ठ विभागाच्या) दिवाणी न्यायाधीशाच्या] न्यायालयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अधीन न्यायालयाने किंवा लघुवाद न्यायालयाने स्वीकारता किंवा त्याची नोंदणी करता कामा नये.

(२) अशा वादीसंबंधीचे प्रत्येक प्रकरण [६][(वरीष्ठ विभागाच्या) [ दिवाणी न्यायाधीशाच्या ] न्यायालयाकडे पाठविण्यात यावे आणि अशा प्रकारचा दावा फक्त [६][(वरिष्ठ विभागाच्या) दिवाणी न्यायाधीशाच्या] न्यायालयातच दाखल करता येईल आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, कलम २४ च्या उपबंधास अधीन राहून, अशा [७][दिवाणी न्यायाधिशाने]त्याची सुनावणी केली पाहिजे. १९०८ चा ५

---

१. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) कलम ४ तसेच सन १९४७ चा मुंबई ४८ कलम ३ याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९४९ मुंबई २२, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९२६ (१९२६ चा मुंबई ६) याच्या कलम २ द्वारे मूळ कलम ३२ ऐवजी हे कलम समाविष्ट करण्यात आले.

४. भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेश याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. विधी अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात येईल.

६. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) कलम ५ तसेच सन १९४७ चा अधिनियम क्र. ४८, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी नवीन मजकूर दाखल करण्यात येईल.

(३) हया कलमातील कोणताही मजकूर सरकारी रेल्वे प्रशासन प्राधिकाऱ्यांच्या विरुध्द केलेल्या दाव्यास किंवा [1][शासनाचा] अधिकारी हा :—

(अ) स्थानिक प्राधिकारी मंडळाचा सभासद आहे म्हणून ; किंवा तो,

१९०८ चा ५. (ब) (१) व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश २४ अन्वये, नियम (४) अन्वये ;

१९१२ चा ४. (२) भारताचा वेड लागलेल्या इसमांबाबत अधिनियम, १९१२, कलम ६९ किंवा ७१ या अन्वये ;

१८९० चा ७. (३) पालक व प्रतिपाल्य अधिनियम, १८९०, कलम ७, १८ किंवा ४२ अन्वये ;

१८६२ चा ६. (४) अहमदाबादच्या तालुकदारांबाबत अधिनियम, १८६२, कलम १ किंवा १७ अन्वये ;

१९०५ चा १. (५) मुंबई प्रतिपालक अधिकरण अधिनियम, १९०५, कलम ३, १९ (१), १९ (२), २०, २२ (१) किंवा ४१ (१) अन्वये नेमणुकीच्या, अधिकार सोपवून देण्याच्या, जाहीर करण्याच्या किंवा अधिकार चालविण्याच्या परत्वे एखाद्या खाजगी इसमाचा किंवा संपत्तीचा संग्रहाव्यक्ष, संरक्षक, व्यवस्थापक किंवा प्रतिनिधी, म्हणून अशा दाव्यात पक्षकार आहे या कारणावरूनच कोणत्याही दाव्यास ह्या कलमांतील कोणताही मजकूर लागू असणार नाही.]

## काढून टाकणे किंवा तात्पुरते दूर करणे

३३. [अभिकथित गैरवर्तणुकीची चौकशी करण्यासाठी नेमलेले चौकशी मंडल] हे कलम, भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये निरसित करण्यात आले.

३४. [उच्च न्यायालयाने, व जिल्हा न्यायाधीशाने अधीन न्यायाधिशांस तात्पुरते कामावरून दूर करण्यासंबंधी व बडतर्फ सरकारच्या अधिकाराचा बचाव] ; हे कलम भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये निरसित करण्यात आले.

## प्रकरण सात

## तात्पुरत्या रिक्त जागा

[2]["३५. जिल्हा न्यायाधीश मरण पावल्यास किंवा रजेवर गेल्यामुळे तो त्याच्या जिल्ह्यामध्ये अनुपस्थित राहिल्यास किंवा तो काम करण्यास असमर्थ झाल्यास, [3][जिल्ह्याच्या सहन्यायाधीशांपैकी] प्रथम दर्जाचा असलेला सहन्यायाधीश, किंवा कोणत्याही सहन्यायाधीशाच्या अनुपस्थितीत, जिल्ह्याच्या [4][अपर जिल्हा न्यायाधीशांपैकी] प्रथम दर्जाचा असलेला [4][अपर जिल्हा न्यायाधीश] किंवा कोणत्याही [3][जिल्हा सहन्यायाधीशाच्या] आणि [4][अपर जिल्हा न्यायाधीशाच्या] अनुपस्थितीत, जिल्ह्याच्या दिवाणी न्यायाधीशांपैकी प्रथम दर्जाचा असलेला दिवाणी न्यायाधीश, त्याच्या नेहमीच्या अधिकारितेमध्ये व्यत्यय न येऊ देता, जिल्हा न्यायालयाचा कार्यभार ग्रहण करील आणि अशा प्रकारे कार्यभार धारण केलेला असताना तो, वाद आणि अपिले दाखल करून घेणे, वाद प्रतिवाद ऐकून घेणे अंमलबजावणी विषयक आदेशिका व रिट व तत्सम गोष्टी मिळवणे यां संबंधातील जिल्हा न्यायाधीशाची कर्तव्ये पार पाडील व जिल्हा न्यायाधीशांपुढे दाखल करण्यात आलेले किंवा दाखल करण्यात येतील किंवा त्याच्यापुढे प्रलंबित असतील असे कोणतेही तातडीचे वाद, अपिले आणि इतर कार्यवाही (कोणत्याही विशेष अधिनियमाखालील कोणतेही अर्ज किंवा निर्देश यांसह) देखील निकालात काढील. जिल्हा न्यायाधिशाचे पद तात्पुरते रिक्त होणे.

---

१. विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र. ४६, कलम १७ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम ३५ दाखल करण्यात आले.

३. सन १९८४ चा महा. अधि. क्र. २७, कलम २(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अशी कर्तव्ये पार पाडणारा आणि अशा शक्तींचा वापर करणारा न्यायाधीश हा जिल्ह्याचा प्रभारी पदनिर्देशित [१][जिहा सहन्यायाधीश] [२][अपर जिल्हा न्यायाधीश] किंवा यथास्थिति दिवाणी न्यायाधीश असेल आणि तो, जिल्हा न्यायाधीशाच्या पदावर यथोचितरीत्या नेमणूक केलेला अधिकारी त्या पदावर परत रुजू होईपर्यंत किंवा तो त्या पदाचा कार्यभार ग्रहण करीपर्यंत असा कार्यभार धारण करण्याचे चालू ठेवील".

जिल्हा न्यायाधिशाचे अधिकार सोपविणे.

३६. कोणत्याही जिल्हा न्यायाधिशास [३][कोणताही [१][जिहा सहन्यायाधीश] उपलब्ध नसेल अशा बाबतीत] तो सदर स्टेशन सोडून कामकाजाकरिता जिल्ह्यातील कोणत्याही जागी जाईल तेव्हा कलम ३५ मध्ये निकडीची म्हणून ज्या कोणत्याही कामांची गणना केली असेल ती कामे करण्याचा अधिकार सदर स्टेशनातील कोणत्याही [२][अपर जिल्हा न्यायाधीशाकडे] किंवा त्याच्या गैरहजेरीत [४][दिवाणी न्यायाधीशांकडे] सोपवून देण्याचा अधिकार आहे ; आणि अशा अधिकाऱ्यांस यथास्थिती अशा सदर स्टेशनातील *[अपर जिल्हा न्यायाधीश] किंवा [४][दिवाणी न्यायाधीश] म्हणून नामोद्दिष्ट करण्यात आले पाहिजे.

दुय्यम न्यायाधिशाचे तात्पुरते रिक्त झालेलें पद.

३७. कोणताही [४][दिवाणी न्यायाधीश] मरण पावेल, किंवा त्यास तात्पुरते कामावरून दूर करण्यात आले किंवा तो तात्पुरता गैरहजर असेल तेव्हा, जिल्हा न्यायाधिशास त्याच जिल्ह्यांतील कोणत्याही अधीन न्यायालयाच्या न्यायाधिशाला रिक्त झालेल्या दुय्यम न्यायालयाच्या न्यायाधिशाची कामे अशा न्यायालयाच्या किंवा त्याच्या स्वतःच्या न्यायालयांच्या जागी करण्याचे अधिकार देता येतील. परंतु अशा प्रत्येक बाबतीत दोन्ही न्यायालयाची नोंदणी पुस्तके आणि दफ्तरे वेगवेगळी ठेवण्यात आली पाहिजे.

## प्रकरण-आठ

## प्रशासी अधिकारी

३८. [प्रशासी अधिकाऱ्यांची नेमणूक वगैरे] हे कलम भारतीय विधि अनुकुलन परिषद आदेश या अन्वये निरसित करण्यात आले.

प्रशासी अधिकाऱ्यांची कर्तव्ये.

३९. [५][[दिवाणी न्यायालयांच्या प्रशासी अधिकाऱ्यांची] कर्तव्ये.] उच्च न्यायालय वेळोवेळी विहित करील अशा नियमांन्वये नियमित करण्यात आली पाहिजेत.

न्यायालयांचे कारकून नेमण्याचे अधिकार

४०. [६][या अधिनियमान्वये कोणत्याही दिवाणी न्यायालयास न्याय कारकून नेमण्याचा अधिकार आहे.] अशा कारकुनास उच्च न्यायालय वेळोवेळी विहित करील अशी करावयाची कामे धरून त्यास फिर्यादी स्वीकारण्याचा व त्यांची नोंदणी करण्याचा अधिकार आहे आणि ज्या फिर्यादी स्वीकारण्यात न याव्यात असे त्यास वाटत असेल त्या सर्व फिर्यादीचा त्याने न्यायालयाच्या न्यायाधिशाकडे उल्लेख केला पाहिजे ; तसेच त्यात आदेशिकावर सही करण्याचा आणि कागदपत्रांच्या अधिकृत प्रतीवर सही करण्याचा अधिकार आहे.

४०-अ. [न्यायालयाचे कारकून किंवा प्रशासी अधिकारी यांची बदली करण्याचा अधिकार] हे कलम भारतीय विधि अनुकुलन परिषद आदेश या अन्वये गाळण्यात आले.

---

१. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाचा कलम २(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम १८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा मुंबई १०) याचे कलम ४ तसेच सन १९४७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ३ मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २(क) च्या तरतुदीनुसार मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील प्रमाणे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण–नऊ

### संकीर्ण

४१. उच्च न्यायालय वेळोवेळी विहित करील अशा नियमानुसार प्रत्येक दिवाणी न्यायालयाचे कामकाज ठेवले पाहिजे व त्याची नोंद केली पाहिजे. कागदपत्रांच्या नकला कोणत्या नियमाअन्वये द्यावा ते नियम ठरविण्याचाही उच्च न्यायालयास अधिकार आहे. कामकाज ठेवण्यासंबंधी नियम.

[1][४१-अ. (१) उच्च न्यायालयास पुढील गोष्टीसाठी वेळोवेळी, या अधिनियमास किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमास सुसंगत असे नियम करण्याचा अधिकार आहे :— लायसन दिलेले विनंती-अर्ज लिहून देणे.

(अ) त्यास अधिन असणाऱ्या न्यायालयात ज्या इसमास विनंती अर्ज लिहून देणारे म्हणून परवानगी मिळेल ते इसम ठरविणे ;

(ब) अशा इसमास लायसन देणे, त्याच्या कामकाजाची पध्दत ठरविणे आणि त्यांनी घ्यावयाची फी याबाबत नियमन करणे ; आणि

(क) अशा रीतीने तयार करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन केले असता त्याबद्दल पन्नास रुपयाहून अधिक नाही इतक्या दंडाची. शिक्षा ठरविणे, आणि नियमांचे असे उल्लंघन केलेल्या बाबींची ज्या प्राधिकाऱ्यास चौकशी करता येईल आणि शास्ती लादता येईल तो प्राधिकारी ठरविणे.

(२) पोट-कलम (१), खंड (क) अन्वये बसविलेला प्रत्येक द्रव्यदंड हा, फौजदारी न्यायाधिशाने त्याचे सामान्य क्षेत्राधिकार चालवून बसविलेल्या दंडाप्रमाणे वसूल करता येईल.]

४२. उच्च न्यायालयाने [2][ [3][राज्य] शासनाची] मंजुरी घेऊन, या अधिनियमाअन्वये रचना केलेल्या न्यायालयाने किंवा अशा न्यायालयाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने कोणत्याही आदेशिकेबद्दल घ्यावयाची फी विहित केली पाहिजे आणि तिचे नियमन केले पाहिजे. आदेशिकेची फी.

अशा रीतीने विहित केलेल्या फीचे कोष्टक [4][राजपत्रात] प्रसिध्द केले पाहिजे.

४३. रविवार [5]* * * *
तसेच प्रत्येक किंवा हरएक जिल्ह्यासाठी जे अन्य उच्च न्यायालय मंजूर करील ते खेरीजकरून इतर दिवशी जिल्हा न्यायालये आणि अधीन न्यायालये भरविण्यात आली पाहिजेत. न्यायालयाची बैठक.

उच्च न्यायालयास त्याच्या नियंत्रणाखालील दिवाणी न्यायालयास प्रत्येक वर्षी एकंदर सहा आठवड्यापेक्षा जास्त नाही इतक्या मुदतीकरिता कामकाज बंद ठेवण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे. सुट्ट्या.

---

१. मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) अधिनियम, १९०० (१९०० चा मुंबई १) कलम ९ द्वारे कलम ४१ अ दाखल करण्यात आले.

२. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

शा.मु.औ.–(एच) २७७–६,०५०–१–२००७.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद.